# उभ्या महाराष्ट्रातील ओबीसींचे 'भुज बळ' आज बीडमध्ये!

बीड ●शुक्रवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ ● वर्ष २० वे ● पाने ४ | http://epaper.beedvastav.com | https://www.beedvastav.com | Email: beedvatsav@gmail.com | ●किंमत ३ रुपये

सांज दैनिक बीड **वास्तव**


RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट








ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com

https://www.beedvastav.com


# छगन भुजबळ यांची मिसाईल कोणा कोणाला लक्ष करणार? याकडे महाराष्ट्राचे वेधले लक्ष!!



## मेळाव्याला धनंजय मुंडेंची उपस्थिती तर मंत्री पंकजा मुंडेंची अनुपस्थिती ?

### आज बीडमधील निघणारा मोर्चा राष्ट्रवादी पुरस्कृत! मनोज जारांगे पाटील यांनी मोर्चाच्या नियोजनावर उपस्थित केले प्रश्नचिन्ह

### बीडमधील आजचा ओबीसींचा महाएल्गार मेळावा इतिहास रचणार : समता परिषदेचे ॲड सुभाष राऊत

### ज्या बीड जिल्ह्यातून ओबीसी आरक्षण संपवण्याचा घाट घालण्यात आला आज तेथेच छगन भुजबळ यांची सभा : बापूसाहेब

**बीड : मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा अध्यादेश काढण्यात आल्यानंतर आता ओबीसी आंदोलनाची आगामी दिशा ठरविण्यासाठी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे आज सायंकाळी माहेलगार मेळावा घेण्यात येणार आहे. या मेळाव्याला माजी मंत्री धनंजय मुंडे हे उपस्थित राहणार असून मंत्री पंकजा मुंडे मात्र उपस्थित राहणार नसल्याचे निकटवर्तीयांकडून समजते. या मेळाव्यावर विरोधाचे सावट असून काही मराठा समन्वयक विरोध करणार असल्याची चर्चा देखील पुढे आली आहे. आजचा ओबीसींचा महाएल्गार मेळावा इतिहास रचना असून या मेळाव्याला ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची प्रतिक्रिया समता परिषदेचे ॲड सुभाष राऊत यांनी व्यक्त केली आहे.**



### ओबीसीमध्ये 374 जाते आहेत मात्र, वरच्या चारच जाती आरक्षण खाताहेत!

●बीडमध्ये आज निघणारा ओबीसींचा मोर्चा हा राष्ट्रवादी अजित पवार गट पुरस्कृत दिसतो आहे. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांचाही कंट्रोल असू शकतो. हैदराबाद गॅझेटचा शासनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच काढला आहे आणि त्यांच्याच मंत्रिमंडळातील मंत्री याला विरोध करत आहेत. याचा अर्थ आम्हाला कळणार नाही, इतके आम्ही दुधखुळे नाहीत. अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी बीड येथील मोर्चाच्या संयोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मराठा समाजाने ठरवले तर बीडमध्येच काय राज्यभरात पाऊल ठेवू देणार नाही, असा इशाराही मनोज जरंगे पाटील यांनी यावेळी दिला. या लोकांना कुणाशी काहीच देणे घेणे नसते, फक्त आपली राजकीय पोळी कशी भाजेल हेच हे लोक बघतात. ओबीसींचे आरक्षण घेऊन ओबीसींचेच वाटोळे केलेले हे लोक आहेत. ओबीसीमध्ये 374 जाते आहेत मात्र वरच्या चारच जाती आरक्षण खात असल्याची टीका जरांगे यांनी केली.

### ओबीसी समाज सध्या व्हेंटिलेटरवर असून भुजबळ हेच आता डॉक्टर!

●ओबीसी समाज सध्या व्हेंटिलेटर असून छगन भुजबळ हेच आता डॉक्टर आहेत. सरकारमध्ये आपली बाजू केलळ तेच मांडत आहेत. ज्या बीड जिल्ह्यातून ओबीसी आरक्षण संपवण्याचा घाट घातला, तेथेच छगन भुजबळ यांची सभा होत आहे. आरक्षणासाठी सर्व ओबीसींनी एकत्र यायला हवे, असा सूर अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व सकल ओबीसी समाज नियोजन बैठकीत निघाला. पुढे बोलताना बापूसाहेब भुजबळ म्हणाले की, महाराष्ट्रात मंडल आयोग लागू करण्यात यावा, यासाठी आपल्या नेत्याने मुख्यमंत्री पदाची आलेली संधी ओबीसी समाजासाठी विचारात घेतली नाही. बीडचा मेळावा उत्साहात व्हावा यासाठी आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन त्यांनी केले.

### जीआर रद्द करा : सुघोष मुंडे

●मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा करण्याच्या निर्णयामुळे ओबीसी समाज आक्रमक झाला असून याच पार्श्वभूमीवर आज बीड मधील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर ओबीसी समाजाच्या मायेल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी गेवराई तालुक्यातून ओबीसी समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

● सुघोष मुंडे यांनी माहिती दिली की, गेवराई मतदार संघातून 500 हून अधिक गाड्या या मेळाव्यासाठी दाखल होणार आहेत.

●सुघोष मुंडे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सरकारकडे मागणी केली आहे की, सरकारने तात्काळ मराठा आरक्षणाचा जीआर रद्द करून ओबीसी समाजावर झालेला अन्याय दूर करावा. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली हा एल्गार मेळावा होणार आहे.


### ओबीसीमध्ये 374 जाते आहेत मात्र, वरच्या चारच जाती आरक्षण खाताहेत!

●बीडमध्ये आज निघणारा ओबीसींचा मोर्चा हा राष्ट्रवादी अजित पवार गट पुरस्कृत दिसतो आहे. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांचाही कंट्रोल असू शकतो. हैदराबाद गॅझेटचा शासनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच काढला आहे आणि त्यांच्याच मंत्रिमंडळातील मंत्री याला विरोध करत आहेत. याचा अर्थ आम्हाला कळणार नाही, इतके आम्ही दुधखुळे नाहीत. अशा शब्दात मनोज जरांगे पाटील यांनी बीड येथील मोर्चाच्या संयोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मराठा समाजाने ठरवले तर बीडमध्येच काय राज्यभरात पाऊल ठेवू देणार नाही, असा इशाराही मनोज जरंगे पाटील यांनी यावेळी दिला. या लोकांना कुणाशी काहीच देणे घेणे नसते, फक्त आपली राजकीय पोळी कशी भाजेल हेच हे लोक बघतात. ओबीसींचे आरक्षण घेऊन ओबीसींचेच वाटोळे केलेले हे लोक आहेत. ओबीसीमध्ये 374 जाते आहेत मात्र वरच्या चारच जाती आरक्षण खात असल्याची टीका जरांगे यांनी केली.


### नकली ओबीसी नेत्यांपासून दूर राहा, मनोज घोडके यांचा इशारा

●रात्र वैऱ्याची आहे, मराठा समाजाचने आरक्षणासाठी शांततेत 58 मोर्चे काढले. मराठा समाजाला पूर्वी स्वतंत्र आक्षण हवे होते. मात्र, आता त्यांना ओबीसी समाजातून आरक्षण हवे आहे. आपण उद्याचा मेळावा मोठ्या उत्साहात पार पाडू, पण काही नकली ओबीसी नेत्यांपासून दूर रहावे लागेल असे आवाहनही मनोज घोडके यांनी यावेळी केले. हा मेळावा ऐतिहासिक झाला पाहिजे, कारण हा मेळावा म्हणजे आपल्या अस्तित्वाचा असल्याचे मनोज घोडके यांनी प्रास्ताविकात म्हटले.

---

## वडवणी तालुका सरपंच संघटनेची पत्रकाराच्या मुलीच्या वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत

➤समाजातील दानशूर व्यक्तीनी हि मदत करण्याचे आवाहन

➤**वडवणी : अशोक फपाळ**

वडवणी तालुक्यातील पत्रकार शंकर जाधव यांची मुलगी श्रेया हिच्या गंभीर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी सरपंच संघटना वडवणी तालुक्याच्या वतीने काल गुरुवार रोजी 31 हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आली. वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील पत्रकार शंकर जाधव यांची नऊ वर्षी मुलगी श्रेया हिला जन्माच्या तीन महिन्यापासून थँलेसेमिया तिच्या शरीरात नैसर्गिक रक्त पुरवठा होत नसल्याचा हा गंभीर आजार असुन यासाठी बेंगलोर येथील हॉस्पिटलमध्ये



तिच्या वर एक वर्ष वैद्यकीय उपचार करण्यात येणार असून यासाठी 15 लाख रुपये हॉस्पिटल खर्च व इतर दहा लाख रुपये खर्च असा एकूण 25 लाख रुपये खर्च असून यामध्ये शंकर जाधव यांची आर्थिक

● पान ४ वर...

## विना परवाना रास्ता रोको केला; कोरडेवाडीच्या ३०० जणाविरुद्ध गुन्हा नोंद

➤**केज : वसंत सोनवणे**

केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील नागरिकांनी साठवण तलाव मंजूर व्हावा या व इतर मागण्यासाठी मंगळवारीदुपारीं साडे बारा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत विना परवाना रास्ता रोको आंदोलन करून येणारी, जाणारी वाहने व पदाचारी नागरिक यांची अडवणूक केल्याच्या आरोपवरून धर्मवीर संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळ राजे आवारेपाटील, यांचेसह तब्बल ३०० लोकांविरुद्ध केज पोलिसात मंगळवारी रात्री १० वाजता गुन्हा नोंद झाला आहे. केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील साठवण तलाव तात्काळ मंजूर करावा



या व इतर मागण्यासाठी राजश्री राठोड -गमेपाटील यांनी ३ ऑक्टोबर पासून कोरडेवाडी येथे उपोषण सुरु केले आहे. परंतु प्रशासनाने व लोकप्रतिनिधिनी याची दखल घेतली नाही म्हणुन ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५-०० वाजण्याच्या दरम्यान तहसील कार्यालयाच्या परिसरात बैलगाडी जाळून प्रशासनाचा निषेध नोंदविला.

● पान ४ वर...

वामा चित्रपटाच्या अफाट यशानंतर

## डॉ. महेशकुमार, गौतमी पाटील यांचा 'सरीवर सरी' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला



➤**बीड : प्रतिनिधी**

चार महिन्यांपूर्वी एकाच वेळी ३०० हून अधिक सिनेमा गृहांमध्ये प्रदर्शित झालेला "वामा" चित्रपट अजूनही अनेक ठिकाणी चालू आहे, बीडमध्ये सलग दोन आठवडे हाउसफुल चा बोर्ड लावणारा मराठवाड्याचा रांगडा हिरो डॉ. महेश कुमार आणि प्रेक्षकांच्या हृदयाचा ठोका चुकवणारी महाराष्ट्राची नृत्य सम्राज्ञी गौतमी पाटील ही अनोखी जोडी या चित्रपटामधून पाहायला मिळणार आहे.

सुप्रसिद्ध निर्माते अनंत जाधव यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. दुग्ध शर्करा योग असा आहे की या चित्रपटाची गाणी ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर, साधना सरगम, वैशाली सामंत आणि कु. अनन्या सुरेश वाडकर यांनी गायली आहेत.

पारिजात चव्हाण यांनी ही सर्व गाणी संगीतबद्ध केली आहेत. मुंबई येथील पत्रकार परिषदेत तसेच बीड येथील मुक्त पत्रकार डॉ. संजय तांदळे यांच्याशी बोलताना डॉ. महेश कुमार म्हणाले की, सरीवर सरी हा चित्रपट प्रेक्षकांना नक्की आवडेल कारण कौटुंबिक, सामाजिक, भावनिक, सस्पेन्स, थ्रिलर असा एक अनोखा प्रयोग आम्ही या चित्रपटाद्वारे केला आहे, तरी सरीवर सरी हा चित्रपट सर्वांनी चित्रपटगृहांमध्ये जाऊन पहावा, असे आवाहन बीडचे भूमिपुत्र अभिनेते डॉ. महेश कुमार यांनी केलेआहे.

## प्रणाली राजू राठोडचे धावणे स्पर्धेत यश



➤**बीड : प्रतिनिधी**

जीवनदीप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनीने जिल्हा स्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये प्रणाली राजू राठोड हिने 3000 मीटर धावणे या स्पर्धेमध्येघवघवीत यश संपादन केले आहे. याबद्दल जीवनदीप शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थाचालक रवींद्र दळवी तसेच संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दळवी यांनी विद्यार्थिनी प्रणाली राजू राठोड हिचे कौतुक केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रणाली राजू राठोड हिने 3000 मीटर धावणे या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून शाळेचे व गावाचे नाव उज्वल केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका रामेश्वरी गायकवाड मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षिका वृंद यांनी खेळाडूंचे कौतुक केले तसेच या स्पर्धेसाठी मेहनत घेणारे क्रीडा प्रमुख दत्तात्रेय दळवी तसेच सुजाता ठोकळ यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ॲड प्रकाश कवठेकर यांना माता सावित्री फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर

➤**मुंबई : प्रतिनिधी**

बीड येथील तेजस ग्रुपचे चेअरमन तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड प्रकाश दादा कवठेकर यांना माता सावित्री / फातिमा सार्वजनिक वाचनालय कुर्ला ( पूर्व ) मुंबई यांच्या वतीने माता सावित्री / फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.



याबाबत थोडक्यात माहिती अशी की, बीड येथील उद्योग क्षेत्रामध्ये नाव कमवलेले व मनमिळावू स्वभाव गरजूंना मदतीचा ध्यास सामाजिक कार्याची आवड आणि आदर्श व्यक्तिमत्व या गुणामुळे ॲड प्रकाश दादा कवठेकर यांनी अल्पावधीतच जनमानसात ठसा उटवला आहे. सर्वसामान्य कुटुंबातून स्वत:च्या हिमतीवर प्रगती करून युवकासमोर प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. स्वत: नोकरी न करता व्यवसायामध्ये तेजस इलेक्ट्रिकल च्या माध्यमातून व्यवसायाला सुरुवात केली आणि आज ऑक्सितेज मिनरल वॉटर, तेजस प्रोडक्शन कंपनी, तेजस अर्थमूव्हर्स, तेजस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, तेजस डिजिटल मार्केटिंग आदी, या उपक्रमाद्वारे आणि आपल्या सामाजिक बांधिलकी

● पान ४ वर...

## शिल्लेगांव तसं चांगलं पण ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचारामुळे वेशीला टांगलं!!

### शिल्लेगांव ग्रामपंचायतला गावकऱ्यांनी ठोकले टाळे

➤**गंगापूर : गुलाब वाघ**

तालुक्यातील शिल्लेगांव तसं चांगलं पण ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचारामुळे वेशीला टांगलं असे दुर्दैवाने म्हणण्याची वेळ आली आहे कारण आज गुरुवारी गावकऱ्यांनी सकाळी दहा वाजता ग्रामपंचायत कार्यालयला गावाकऱ्यांनी टाळे ठोकले. दरम्यान शिल्लेगाव ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या मनमानी कारभार व ग्रामस्थाच्या समस्याविषयी ग्रामपंचायतच्या विविध कामातील गैरव्यवहाराविषयी





चौकशीसाठी बऱ्याच वेळेस लेखी निवेदने देऊनही कारवाई न झाल्याने तसेच गावातील ड्रेनेज लाईन व पाणीपुरवठाच्या निकृष्ट

● पान ४ वर...

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# दिवाळी आणि आतिषबाजी





विशेष

– पर्यावरणवादी – लेखक

प्रा. डॉ. निखिल निळकंठ जाधव
( सदस्य, जागतिक मानवाधिकार बचाव आयोग, अमेरिका )

दिवाळी म्हणजे सणांचा राजा प्रकाश, रोषणाई, आनंद आणि एकत्र येण्याचा उत्सव. "दीपावली" म्हणजे अंध:कारावर प्रकाशाचा विजय; पण आज हा विजय खूपच तेजस्वी झाला आहे आणि तो पण फटाक्यांच्या तेजाने. ताऱ्यांसारख्या रंगीत गोळ्या आकाशाच्या कुशीत फुटतात, डोळे चमकतात, मन जिज्ञासेने भरतं पण त्या आनंदाच्या मागे अनेक प्रश्न दडलेले आहेत.

इतिहासकार पी.के. गोदे यांच्या हिस्ट्री ऑफ फायरवर्कस इन इंडिया बिट्विन एडी १४०० आणि १९०० या पुस्तकात म्हटलं आहे की, सुमारे १४व्या शतकापासून भारतात बारुद (गन पावडर) युद्धासाठी वापरण्यात येऊ लागले, आणि त्याच तंत्राचा वापर सण–समारंभात रंगीत आतिषबाजीसाठीही होऊ लागला. १४४३ मध्ये, तैमूरिद सुलतान शाहरुखाच्या राजदूत अब्दुर रज्जाक यांनी वर्णन केलं की, विजयनगर राज्यात महानवमी सोहळ्यांमध्ये आतिषबाजी आणि विविध फटाके उधळण्यात येत होते. उन्हाळ्याच्या अंतिम सत्री आणि पावसाळ्यानंतर थंड हवामान सुरू होण्यापूर्वी दृश्यमान आणि ऐकण्यासारख्या उत्सवांसाठी फटाके एक प्रकारे उत्साह वाढवणारे माध्यम बनले पण आता काळ बदलला आहे; आता फटाके दिवाळी सणाचा अविभाज्य भाग झाले आहेत.

### - पर्यावरण आणि आरोग्य:

फटाके फोडल्यावर धूर, धुळीचे कण विशेषत: सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड्स, आणि इतर रासायनिक घटक वातावरणात पसरतात. हे फुफ्फुस, हृदय, त्वचा आणि डोळ्यांचे विकार होण्यामागे महत्वपूर्ण भूमिका बजावतात. पुणे येथील संशोधनानुसार काही फटाके फोडल्यावर धुळीच्या कणाच प्रमाण असं वाढलं की त्यामुळे श्वासोच्छ्वास कमी होणे, आणि अस्थमा व ब्रॉन्कायटिस या सारख्या आजारांनीग्रस्त रुग्णाच्या संख्येत वाढ झाली असे आढळले.

शहरी भागातील लोकांसाठी, विशेष करून वृद्ध, आजारी व्यक्ती आणि लहान मुलं या सगळ्यांसाठी ध्वनी प्रदूषण खूप त्रासदायक ठरते; आवाजाचा तीव्रपणा, अचानक फटाके फुटल्यावर घाबरून जाणे; झोप हरवणे, मानसिक ताण वाढणे हे सगळे परिणाम दिसुन येतात.

पर्यावरणावरही याचा दूरगामी परिणाम होतो फटाक्यांच्या धुराने आकाश धूसर होते, पानांवर धूराचे थर जमा होतात, ज्याने प्रकाश संश्लेषण कमी होतो. जमिनीत आणि पाण्यात पडणारे रासायनिक अवशेष वनस्पतींच्या मुळांपर्यंत पोहोचतात ज्यामुळे त्यांच्या पोषणावर परिणाम होतो, तसेच पक्ष्यांना व प्राण्यांना त्रास होतो व त्यांचे स्थलांतर वाढत जात आहे.

### - सांस्कृतिक आणि सामाजिक बाजू :

फटाके फक्त आवाज आणि प्रकाशच नाहीत तर ते आनंद व्यक्त करण्याचं माध्यम बनले आहेत. नात्यांची जुळवाजुळव करण्याचे, समाजात प्रतिष्ठा स्थापन करण्याचे आणि उत्सवात जोश आणण्याचे साधन बनले आहेत. एवढेच नाही तर तरुणांचे फाटक्या सोबत फोटो आणि सोशल मीडियातून शेअर होणाऱ्या त्या जीवंत रंगांची छटा हे सर्व दिवाळीचा हिस्सा झाले आहेत.

हे सर्व असले तरी प्रत्येकात संवेदनशीलता असावी जे लोक आजारी आहेत, ज्यांना श्वसनाचे आजार आहेत जसे अस्थमा, सीओपीडी, ब्रोंकायटीस किंवा हृदयाचे आजार असतील; वृद्ध ज्यांना आवाजाच्या तीव्रतेने झटका किंवा कर्णबधिरता येऊ शकते अश्या नागरिकांची काळजी घ्यावी आवाजाची तीव्रता आणि वाजवण्याचे प्रमाण कमी ठेवावे.

भारतात फटाक्यांच्या वापरावर अनेक कायदेशीर निर्बंध आहेत विक्री, वय, आवाज मर्यादा, आणि पर्यावरणीय नियम. काही राज्यांनी "ग्रीन क्रॅकर्स" किंवा कमी ध्वनी आणि कमी धूर करणारे फटाके बाजरात आणले आहेत.

### - नव संकल्प :

तरुण मित्रानो, आपल्या संस्कृतीचा भाग असलेला दिवाळीचा उत्सव टिकवण्याची संधी आपल्याकडे आहे, पण त्याचबरोबर आपलं भविष्य स्वच्छ हवा, आरोग्य, शांतता या गोष्टींचं जतन करायचं आहे. आपणा सर्वांना दिवाळीचा आनंद हवा आहे रंगीत दिवे, फटाके, पारंपारिक गोडधोड. पण तरुण म्हणून ही जगणं महत्वाचं आहे की आपण आपल्या सणाचा उत्साह शांततेत, निसर्गाच्या संगतीत आणि सभ्यतेने साजरं करुया.

फटाके हे आनंदाचे क्षण, पण जबाबदारीही आहे फटाक्यांचा वावर पूर्णपणे भारतीय सणांमध्ये बंद करावा असे माझे मत नाही, पण फटाक्यांचा मर्यादित वापर करून आणि पर्यावरणपूरक फटाके वापरून सणांचा आनंद घेतला जाऊ शकतो असे माझे मत आहे.

सणात आतिषबाजी करुन मजा करणे हा आपला उद्देश नसावा, पण इतरांच्या आरोग्यावर आणि पर्यावरणावर दुष्परिणाम न करता. मर्यादित उपयोग, पर्यावरणपूरक पर्याय, आणि सामाजिक संवेदनशीलता यांचा संगम असेल तर दिवाळी खरी दिवाळी बनेल प्रकाशात आणि शांततेत; रंगात आणि स्वच्छतेत; आनंदात, पण जबाबदारीत म्हणून या दिवाळीत एक संकल्प करूया — "प्रकाश दिव्यांचा, मर्यादित फटाक्यांचा ; सण आनंदाचा सामाजिक बंधू भावाचा, प्रदूषण विरहिततेचा"

आपण तरुण आहोत, बदल घडवू शकतो. सर्वांना दिवाळीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

# आज आहे वसुबारस, जाणून घ्या त्याचे महत्त्व आणि पूजा विधी





आज शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५, दिवाळीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात 'वसुबारस' या सणाने होत आहे. महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याला 'गोवत्स द्वादशी' असेही म्हणतात.

हा सण नेमका काय आहे, त्याचे महत्त्व काय आहे आणि तो कसा साजरा करतात, याबद्दल सविस्तर माहिती

### वसुबारस म्हणजे काय?

वसुबारस हा सण आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील द्वादशी तिथीला साजरा केला जातो. या दिवशी गाईची आणि तिच्या वासराची (गोवत्स) पूजा करून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. हिंदू धर्मात गायीला 'गोमाता' मानले जाते आणि तिच्यामध्ये ३३ कोटी देवता वास करतात, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

### सणाचे महत्तव

वसुबारस हा दिवाळीच्या पाच दिवसांच्या उत्सवातील पहिला दिवस असतो. या दिवसापासून घरासमोर रांगोळी काढण्यास आणि पणत्या लावून रोषणाई करण्यास सुरुवात होते.

गाय ही भारतीय कृषी संस्कृतीचा आधारस्तंभ आहे. दूध, शेणखत आणि शेतीमध्ये बैलांचे योगदान अनमोल असते. या सणातून शेतकरी आणि सर्वसामान्य लोक गोधनाबद्दल आपली कृतज्ञता आणि आदरभाव व्यक्त करतात.

समुद्रमंथनातून उत्पन्न झालेल्या 'नंदा' नावाच्या कामधेनूच्या पूजनासाठी हे व्रत केले जाते. अनेक स्त्रिया आपल्या मुला–बाळांना उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी लाभावे आणि घरात धन–धान्याची कधी कमतरता भासू नये, यासाठी या दिवशी उपवास करतात आणि पूजा करतात.

गोमाता आणि वासरू यांची पूजा करणे हे सर्व देवतांचे पूजन केल्यासारखे मानले जाते, ज्यामुळे घरात सुख–शांती आणि भरभराट नांदते.

### पूजा विधी आणि उपवास

वसुबारसेच्या दिवशी विशेषत: घरातील सवाष्ण स्त्रिया खालीलप्रमाणे पूजा करतात

गाय आणि तिच्या वासराला स्वच्छ अंघोळ घातली जाते. त्यांना नवीन वस्त्रे (झूल) घातली जातात किंवा अंगावर हळद–कुंकू लावले जाते.

स्त्रिया गाईच्या पायावर पाणी घालून, हळद, कुंकू, फुले आणि अक्षता अर्पण करतात. तिच्या गळ्यात फुलांची माळ घालतात. निरांजनाने (दीपाने) गाईची ओवाळणी (आरती) केली जाते. त्यानंतर गोड नैवेद्य दाखवला जातो. त्यांना गव्हाचे पदार्थ, हरभरा, मूग नैवेद्य म्हणून दिला जातो.

### या दिवशी अनेक स्त्रिया उपवास करतात

पूजा झाल्यावर गोवत्स व्रताची कथा वाचली किंवा ऐकली जाते.

### आजचा शुभ मुहूर्त

आज, १७ ऑक्टोबर २०२५ रोजी वसुबारस आहे. पूजेसाठी प्रदोषकाळातला (सायंकाळचा) मुहूर्त शुभ मानला जातो.

### द्वादशी तिथी प्रारंभ:

१७ ऑक्टोबर, सकाळी ११:१२ वाजता.

### पूजन मुहूर्त (प्रदोष काळ):

सायंकाळी ५.४९ ते रात्री ८.२० वाजेपर्यंत (हा कालावधी पूजा करण्यासाठी विशेष शुभ आहे).

### वसुबारस २०२५; तिथी, पूजा विधी, कालावधी आणि शुभ मुहूर्त

### जाणून घ्या

हिंदू धर्मातील वसुबारस या सणाला अत्यंत धार्मिक महत्त्व आहे. महाराष्ट्र आणि गुजरातसह देशाच्या विविध भागांत हा सण श्रद्धा व भक्तिभावाने साजरा केला जातो. वसुबारसला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात.

● या दिवशी गाईंची पूजा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. आश्विन महिन्यातील वद्य द्वादशीला हा सण साजरा केला जातो. यंदा वसुबारस कधी आहे? कोणत्या मुहूर्तावर पूजा करावी? पूजा कशी करावी? याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊया...

● यंदा 17 ऑक्टोबर (शुक्रवार) 2025 रोजी वसुबारस आहे.

वसुबारस 2025 तिथी आणि मुहूर्त द्वादशी तिथीस 17 ऑक्टोबर सकाळी 11:12 वाजता प्रारंभ होणार आहे. द्वादशी तिथी 18 ऑक्टोबर दुपारी 12:18 वाजता समाप्त होणार आहे.

● पूजनाचा मुहूर्त (प्रदोष काळ) : संध्याकाळी 6.14 वाजेपासून ते रात्री 8.42 वाजेपर्यंत आहे. यानुसार पूजा करण्यासाठी एकूण 2 तास 28 मिनिटांचा कालावधी मिळणार आहे.

### वसुबारसची पूजा कशी करावी?

वसुबारसच्या दिवशी सवत्स गायीची म्हणून गायीसह वारसाची पूजा करण्याची परंपरा आहे. तुमच्या घरामध्ये गाय–वासरू असेल तर त्यांना आंघोळ घालून त्यांचे औक्षण करावे.

● पिवळ्या रंगाचे वस्त्र आणि फुले त्यांना अर्पण करा. तुमच्याकडे गाय वासरू नसतील तर एखाद्या गोशाळेमध्ये जाऊन पूजा करू शकता. तेही शक्य नसेल तर गाय आणि वासराच्या मातीच्या मूर्तीची पूजा करावी. संध्याकाळी शुभ मुहूर्तावर पूजा–आरती करावी. गायीला हिरवा चारा, चणे, मोड आलेले मूग आणि गोड पदार्थांचा नैवेद्य अर्पण करावा.

### वसुबारसच्या दिवशी या दोन गोष्टी करुन पाहा

● ज्योतिषशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ शिरीष कुलकर्णी यांच्या मते, तुमच्या आसपास गोशाळा असल्यास तिथे मदत करणे फार शुभ मानले जाते, कारण काही लोक नि:स्वार्थ मनाने गाय आणि वासरांचे जीव वाचवतात.

● याशिवाय, एखाद्या गरजवंताला फराळ, अन्न किंवा अन्य आवश्यक वस्तू दान केल्यासही धार्मिक आणि सामाजिक दृष्ट्या मोठा पुण्याचा लाभ होतो.

• सांज दैनिक बीड • वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक – अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना ५७७ कोटी रुपयाचे पॅकेज

## आ. विजयसिंह पंडित यांनी मानले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार



➤ गेवराई : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले होते. महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीत बाधित शेतकऱ्यांसाठी ५७७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले असून शेतकऱ्यांना अतिवृष्टी व पुरामुळे झालेली नुकसान भरपाई मिळावी म्हणून सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने पॅकेज जाहीर करून दिवाळी भेट दिली असून दोन दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होणार असून सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना आधार मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाहीत त्यांनी दोन दिवसात ईकेवायसी करुन घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. विशेषत : गेवराई तालुक्यात गोदावरी आणि सिंदफना नदीमध्ये आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या होत्या तर अतिवृष्टीमुळे शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले होते. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचा दौरा करुन शेतकऱ्यांचे अश्रू पुसले होते. यावेळी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, एकनाथ शिंदे यांच्यासमोर सर्व परिस्थिती गंभीरतेने मांडली होती, त्या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय जारी करुन अतिवृष्टी बाधित बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ५७७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले असून आ .विजयसिंह पंडित यांनी अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आर्थिक पॅकेज जाहीर करून दिवाळीची भेट दिली असून दोन दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होणार असून सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना आधार मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नाहीत त्यांनी दोन दिवसात ईकेवायसी करुन घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

# चालत्या पिकअपअधून ८० हजाराच्या ८ बोकडांची चोरी




➤ केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग शिवारातील पुलाजवळ चालत्या पिकअप मध्ये अज्ञात चोरट्याने चढून प्रती नग १० हजार रुपया प्रमाणे ८० हजाराचे ८ बोकडाची चोरी केल्या प्रकरणी पिकअप चालकाच्या फिर्यादीवरून केज पोलिसात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे.

बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथून २० बोकड लातुर जिल्ह्यातील मुरुड येथील जाणवराच्या बाजारात विक्रीसाठी घेवून जात आसताना मस्साजोग शिवारात पावणे चार ते सव्वा चार वाजण्याच्या दरम्यान चालत्या पिकअप वर अज्ञात चोरट्यानी चढून ८० बोकडाची चोरी केली. प्रत्येकी १० हजार रुपया प्रमाणे ८० हजार रुपयाच्या ८ बोकडाची अज्ञात चोरट्यानी चोरी केल्याप्रकारांनी पिकअप चालक भाऊसाहेब बाबासाहेब सिदगुर रा नांदूर हवेली ता बीड. यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आसून पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उप निरीक्षक प्रल्हाद चव्हाण हे पुढील तपास करीत आहेत.

# सक्षम नागरिक निर्माण करण्याचा उद्देश शारदा ज्ञानोस्तवाचा : रणविर पंडित

## ➤ माध्यमिक विद्यालय सिरसदेवी येथे वादविवाद स्पर्धा संपन्

➤ गेवराई : प्रतिनिधी

शारदा ज्ञानोस्तवाची गुणवत्ता वाढत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व गुणात यामुळे वाढ होत आहे. विद्यार्थ्यांनी या वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून आपली ओळख निर्माण करावी. एक सक्षम नागरिक निर्माण करण्याचा उद्देश शारदा ज्ञानोस्तवाच्या मागचा आहे असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शारदा ज्ञानोत्सवातील वादविवाद स्पर्धेचा शुभारंभ करताना ते



बोलत होते. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शारदा ज्ञानोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सिरसदेवी येथे करण्यात आले. यावेळी शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष रवींद्र गाडे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालीदास नवले, माजी उपसभापती शाम मुळे, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, अशोकराव थोपटे, सरपंच शरद कबले, बळीराम चव्हाण, केशव जाधव, शरद कागदे, उपसरपंच कैलास पवार, ह.भ.प. गणपत उबाळे, चेअरमन राजेंद्र हिंगे, स्पर्धेचे परीक्षक प्रा. शरद सदाफुले, चौधरी, कदम संस्थेचे सहप्रशासनाधिकारी प्रा. गोगुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक कल्याण कोकाटे यांनी केले. सुत्रसंचलन कोळपे यांनी केले. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, स्पर्धक विद्यार्थी आणि बहुसंख्य पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शारदा विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

### प्राथमिक गटातुन कुंदन मोरे तर माध्यमिक गटातून कु. रागिणी नवले प्रथम

● वादविवाद स्पर्धेमध्ये प्राथमिक गटातून प्रथम कुंदन गजानन मोरे, (माध्यमिक विद्यालय, सिरसदेवी) द्वितीय क्रमांक कु. महारनोर तन्वी अशोक( यमादेवी विद्यालय, जातेगाव) तृतीय क्रमांक कु. ज्ञानेश्वरी प्रमोद गिरी( माध्यमिक विद्यालय, रामपुरी) तसेच माध्यमिक गटातून प्रथम कु. रागिनी कालिदास नवले( शिव शारदा पब्लिक स्कूल गढी) द्वितीय क्रमांक कु. फरहिन जहुर काजी,( माध्यमिक विद्यालय, राक्षसभुवन) तृतीय क्रमांक कु. वैष्णवी योगेश चंदने ( माध्यमिक विद्यालय, पाचेगाव) यांनी मिळवला.

● उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे पंच म्हणून प्रा. शरद सदाफुले, डॉ. तात्यासाहेब मेघारे, सुनील चौधरी यांनी काम पाहिले.

# प्रकाशाचा विजय : २०२५ च्या सावल्यांतून उगवणारी दीपावली...!

"अंधाराचा अंत हाच प्रकाशाचा जन्म असतो" — ही ओळ २०२५ च्या जगाला अगदी साजेशी वाटते. युद्ध, नैसर्गिक आपत्ती, आर्थिक चढउतार, आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान लाटेमुळे जग आज एका विचित्र द्वंद्वातून जात आहे. माणूस प्रगतीच्या प्रकाशात पुढे जातोय, पण मनाच्या गाभाऱ्यात थकलेला दिसतो. अशा पार्श्वभूमीवर दीपावली पुन्हा एकदा सांगते — "आशेचा दिवा कधीही विझू देऊ नकोस".

दीपावली हा फक्त सण नाही, तर भारतीय संस्कृतीचा श्वास आहे. प्रत्येक दिवा म्हणजे उजेडाची प्रार्थना, प्रत्येक रांगोळी म्हणजे आनंदाचे चित्र, आणि प्रत्येक फुलबाजीतून उमटणारी चमक म्हणजे आशेचा ठिणगा. परंपरेने हा सण अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि दु:खावर आनंदाचा विजय साजरा करणारा आहे.

दीपावली पर्व — पाच दिवसांचा प्रकाशोत्सव

भारतामध्ये दीपावली हा एक दिवसाचा नव्हे, तर पाच दिवसांचा प्रकाशोत्सव आहे. या प्रत्येक दिवसाचा एक सुंदर अर्थ आहे.


पहिला दिवस — धनत्रयोदशी : आरोग्य आणि संपत्तीचे प्रतीक, या दिवशी धन्वंतरी देवतेची पूजा होते.

दुसरा दिवस — नरक चतुर्दशी (लहान दिवाळी) : श्रीकृष्णाने असुर नरकासुराचा वध केला, म्हणून हा दिवस वाईटावर चांगुलपणाचा विजय म्हणून साजरा होतो.

तिसरा दिवस — लक्ष्मीपूजन (मुख्य दिवाळी) : या रात्री लक्ष्मीदेवीची आराधना केली जाते. घराघरांत दिव्यांची रांग, सुगंधी फुले, रांगोळ्या आणि गोडधोड पदार्थांची रेलचेल असते.

चौथा दिवस — पाडवा (बलिप्रतिपदा) : राजा बळी आणि विष्णू यांची कथा स्मरून कृतज्ञतेचा सण म्हणून पती–पत्नी एकमेकांप्रती स्नेह व्यक्त करतात.

पाचवा दिवस — भाऊबीज : भाऊ–बहिणींच्या प्रेमाचा



उत्सव. बहिण भावाला आरती करून दीर्घायुष्याची प्रार्थना करते.

ही परंपरा केवळ धार्मिक नाही, तर भारतीय कुटुंब व्यवस्थेतील आपुलकी आणि ऐक्य यांचे प्रतीक आहे. २०२५ हे वर्ष विरोधाभासांनी भरलेले ठरले. युरोपमध्ये युद्धाचे सावट, मध्यपूर्वेतील संघर्ष, आणि आफ्रिकेतील दुष्काळ — या सर्वांनी मानवतेच्या मुळावर घाव घातला. तुर्कीतील भूकंपाने हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली, तर हवामान बदलामुळे जगभरात नैसर्गिक आपत्तींची मालिका सुरू राहिली. परंतु या अंधारातही काही उजेडाचे किरण होते — कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगती, आरोग्य क्षेत्रातील नवे संशोधन, आणि अवकाशात झेप घेणारा भारत. चांद्रयान – ३ च्या यशानंतर आता मंगळयान – २ ची तयारी सुरू आहे. 'मेड इन इंडिया'च्या बळावर भारताने आत्मनिर्भरतेचा नवा अध्याय लिहिला आहे.

आजची दीपावली परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवते. शहरांत स्मार्ट दिवे, इको–फ्रेंडली रांगोळ्या आणि डिजिटल शुभेच्छा, तर गावांत मातीच्या दिव्यांचा मंद उजेड आणि श्रद्धेचा सुगंध. लक्ष्मीपूजनाच्या रात्री घराघरांत दिव्यांची माळ झळकते, पण खरा प्रकाश माणसाच्या अंत:करणात झिरपतो. "दिवा जळतो तो दुसऱ्यांसाठी" ही म्हण आजही तितकीच खरी आहे. पाडव्याच्या दिवशी पती–पत्नीतील स्नेहाचे बंध दृढ होतात, तर भाऊबीजेच्या ओवाळ्यात भाव–बहिणींचे नाते उजळते.

जगभरातही दीपावलीचा प्रकाश पसरला आहे. लंडन, न्यूयॉर्क, सिंगापूर, मॉरिशस, आणि कॅनडा येथे 'फेस्टिवल ऑफ लाइट्स' म्हणून भारतीय संस्कृतीचा हा उत्सव साजरा होतो. २०२५ मध्ये लंडनच्या ट्रॅफल्गार स्क्वेअरवर "सस्टेनेबल दिवाळी" या संकल्पनेखाली प्लास्टिकविरहित सजावट आणि एकत्रित प्रार्थना करण्यात आली. "तमसो मा ज्योतिर्गमय" या मंत्राचा अर्थ जग आता अनुभवत आहे.

फटाक्यांच्या धुरात हरवणाऱ्या आकाशाने आपल्याला विचार करायला लावले आहे. त्यामुळे हरित दिवाळीचा संकल्प अधिक बळावतोय. "दिवे लाव, पण मनही उजळव" — हा संदेश आजची तरुण पिढी सोशल मीडियावर ट्रेंड बनवतेय. रांगोळ्यांच्या रंगांबरोबर विचारांचे रंगही उमटत आहेत.

या वर्षी अनेक दु:खद घटना घडल्या असल्या तरी, मदतीचा हात पुढे करणारे लोकच या जगाचा खरा प्रकाश आहेत. भारतीय स्वयंसेवी संस्था, डॉक्टर्स आणि युवकांनी आपत्तीग्रस्त भागात जाऊन मदतीचा दिवा पेटवला. "दीप तोच खरा, जो दुसऱ्याच्या अंधारात उजेड करतो" — या वाक्यात या वर्षीची दिवाळी जिवंत आहे. २०२५ च्या या दीपावलीत भारत नव्या आत्मविश्वासाने उजळला आहे.

विज्ञानात पुढे, संस्कृतीत ठाम, आणि मानवतेत तेजस्वी — हीच खरी प्रगती. अंधार कितीही गडद असो, एका छोट्याशा दिव्याने तो हरवता येतो.

"दीप जळत राहो, मन उजळत राहो, आणि माणुसकीचा प्रकाश कधीच विझू नये" — हीच प्रार्थना, हीच खरी दीपावली.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**चंद्रकांत सरस्वती**
**प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड




# महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

**आडवी विधाने**

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

**उभी विधाने**

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

विशेष



## प्रा.डॉ.सिद्धार्थ मस्के यांचा गुजरात उच्च शिक्षण विभागाकडून गौरव

माजलगाव / प्रतिनिधी :

येथील केसापुरी वसाहत येथील प्रा .डॉ .सिद्धार्थ श्रीहरी मस्के ( SCOPE ) सोसायटी फॉर क्रियेशन अपोर्च्युनिटी थ्रू प्रोफीशीयंसी इन इंग्लिश प्रकल्प उच्च शिक्षण विभाग गुजरात आणि केंब्रिज विद्यापीठ,यू . के .यांच्या संयुक्त उपक्रमा अंतर्गत दक्षिण गुजरात विभागातून गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,अहवा जि . डांग यास पहिली रँक प्राप्त झाल्याबद्दल या विशेष कामगिरीसाठी उच्च शिक्षण विभाग,गुजरात द्वारा गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ .यु .के .गांगुर्डे व आहवाचे स्कोप समन्वयक डॉ .सिद्धार्थ श्रीहरी मस्के यांना प्रमाणपत्र तसेच कॉलेजला मोमेंटो देऊन गौरव करण्यात आला . तसेच उत्तीर्ण विदयार्थ्यांना केब्रिज विद्यापीठचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आला .

## विना परवाना रास्ता रोको केला; कोरडेवाडीच्या ३०० जणाविरुद्ध गुन्हा नोंद

● पान १ वरून . . . ११ ऑक्टोबर२०२५ रोजी वडवनी तालुक्यातील टोकवाडी येथील पाझर तलावात महिला व पुरुषांनी जलसमाधी आंदोलन केले . आणि मंगळवारी केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारीं १२-३० ते सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत तब्बल साडेचार तास विना परवाना रास्ता रोको आंदोलन करून येणाऱ्या, जाणाऱ्या वाहणांसह पादचारी यांची अडवणूक केल्याच्या आरोपाखाली पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे यांच्या फिर्यादीवरून केज पोलिसात या आंदोलनाचे नेतृत्व करणारे धर्मवीर संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारेपाटील, स्वप्नील महादेव वरपे, योगेश सुभाष रसाळ, अमोल भीमराव पाटील, योगेश शिवाजी मणेरी, संदीप चाळक, सांभाजी आघाव, विशाल कुटे, अण्णासाहेब जाधव, संतोष प्रल्हाद यादव मदन आश्रुबा यादव, विक्रम अभिमान शिंदे, उस्मान मोहमद शेख, दत्ता यादव, दादाराव हिम्मत कोरडे, अनिल कोरडे, बाबा शेख, गंगाधर यादव बळीराम भीमराव यादव, मारुती त्रिंबक तेरवे,अशोक धोंडोबा वरपे, सुदाम नागोराव कोरडे, संजय जालिंदर गिरी, संतोष वेताळ, पप्पू जयवंता शिंदे, बाजीराव बापूराव कोरडे, हुसैन अमीन शेख, प्रमोद राजेंद्र कोरडे, शरद नारायण कोरडे, अशोक विष्णू यादव, उमेश शिवाजी वरपे, धनराज दादाराव वरपे, अशोक बन्सी यादव, जयराम यांचेसह २०० ते ३०० महिला व पुरुष यांचे विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे .पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे हे करीत आहेत .

**बस फोडण्याचे ५ गुन्हे ही नोंद**

दरम्यान रास्ता रोको आंदोलन काळात अज्ञात इसमानी राज्य परिवहन महामंडळाच्या ५ बसवर दगड फेक करून बसच्या काचा फोडल्या प्रकरणी ५ बसचालकांच्या फिर्यादीवरूनही ५ गुन्हे नोंद झाले आहेत .

## वडवणी तालुका सरपंच संघटनेची पत्रकाराच्या मुलीच्या वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत

● पान १ वरून . . . परिस्थिती हलकीची असून ते किंवा त्यांचे कुटुंब इतका मोठा वैद्यकीय खर्च स्वत : करू शकत नसल्यामुळे समाजातील दानशूर व्यक्ती यांनी मदत करावी असे आवाहन करताच याची माहिती कळताच नव्याने स्थापन करण्यात आलेल्या वडवणी तालुका सरपंच संघटनेच्या वतीने पत्रकार शंकर जाधव यांच्या मुलीच्या वैद्यकीय उपचारासाठी 31 हजार रुपये मदत शंकर जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली आहे तरी यावेळी सरपंच संघटनेचे वडवणी तालुका अध्यक्ष अँड . माधव काका शेडगे - , अँड . मयुरशेट आंधळे - उपाध्यक्ष, श्री . गणेश जी अंबुरे - उपाध्यक्ष, श्री . संजय जी धपाटे - सचिव, सरपंच 3 अँड . राज पाटील, सरपच केशव सर आंधळे, सरपच . सुभाष आजबे, सरपच ज्ञानोबा शिंदे सर, सरपच उत्तरेश्वर खताळ, सरपंच . विवेक अंडिल, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हाध्यक्ष अँड . विनायक जाधव, संपादक सतीश राव वाघमारे,डिजिटल मीडिया वडवणी तालुका अध्यक्ष सतीश राव मुजमुले, पत्रकार भैय्यासाहेब तांगडे,पत्रकार अर्जुन राव मुंडे, पत्रकार रामेश्वर गोंडे, पत्रकार धम्मपाल डावरे, पत्रकार विष्णू डोईफोडे सर, पत्रकार वाजेद पठाण इत्यादी उपस्थित होते यावेळी पत्रकार संघटनेच्या वतीने सरपंच संघटना वडवणी तालुका यांचे मदत केल्याबद्दल जाहीर आभार मानण्यात आले आहेत . तसेच या कौतुकास्पद उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे .

## ॲड प्रकाश कवठेकर यांना माता सावित्री फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर

● पान १ वरून . . . जपत कायम आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे . त्यांच्या या कार्याबद्दल वाचनालयाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून हा पुरस्कार सोहळा दिनांक 19 ऑक्टोबर 2025 रोजी सायंकाळी 7 वाजता माननीय बाळासाहेब ठाकरे समाज केंद्र नेहरूनगर कुर्ला ( पूर्व ) मुंबई येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे . या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकाने वतीने केले आहे .

## शिल्लेगांव तसं चांगलं पण ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचारामुळे वेशीला टांगलं!!

● पान १ वरून . . . कामाविषयीही वारंवार तक्रार करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप गावाकऱ्यांनी केला आहे जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही तोपर्यंत टाळे उघडणार नसल्याचे रमेश रंगनाथ नरोडे,विश्वनाथ नरोडे, सुरेश बाबुराव नरोडे,कडू यशवंत आमराव यांच्यासह गावकऱ्यांनी सांगितले असून त्यांच्या निवेदनावर सह्या आहेत .

**दिव्यांग व्यक्तीला दिला चेक खात्यात नाही पैसे,बँकेने चेक केला परत**

शिल्लेगाव ग्रामपंचायतने दिव्यांग निधी अंतर्गत दिव्यांगांना दिव्यांग निधीचा चेक दिलेला आहे मात्र दिव्यांग व्यक्ती सदरचे बँकेत वटवण्यास गेले असता ग्रामपंचायतच्या खात्यावर पैसे नसण्याचे कारण देऊन बँकेने दिव्यांग व्यक्तीला माघारी पाठवली असे दोन वेळेस झाले असल्याचे भाऊसाहेब आसाराम राऊत या दिव्यांग व्यक्तीने सांगितले .

# माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या वतीने 357 विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ साहित्य वाटप

➤ गरजु विद्यार्थ्यांचे मोफत दंत तपासणी शिबिर संपन्न







➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

येथील गेल्या २३ वर्षांपासून निराधार विद्यार्थ्यांसाठी समाजसेवेचा ध्यास घेऊन कार्यरत असलेल्या माजलगाव विकास प्रतिष्ठानने यंदाही दिवाळी निमित्त गरजू विद्यार्थ्यांना फराळ साहित्याचे मोठ्या प्रमाणावर वाटप केले . बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ रोजी लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था, माजलगाव येथे आयोजित या कार्यक्रमात माजलगाव तालुक्यातील २५० आणि धारूर तालुक्यातील १०७ अशा एकूण ३५७ विद्यार्थ्यांना दिवाळीच्या फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले .सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगाव आणि लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात आधार प्रकल्पांतर्गत निराधार विद्यार्थ्यांना फराळ साहित्य वाटपासोबतच मोफत दंत चिकित्सा शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते . या शिबिरात एकूण २०१ विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली .

सविस्तर वृत्त असे की, माजलगाव प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ . मंगलाताई सोळंके आणि सचिव नीला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव विकास प्रतिष्ठान शैक्षणिक साहित्य वाटप, शैक्षणिक सहली, किशोरवयीन मुलांसाठी कार्यशाळा, महिला मेळावा आणि आरोग्य शिबिर यासारखे विविध उपक्रम राबवत आहे . कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पुजनाने झाली . उपस्थित मान्यवरांचे मोगऱ्याचे रोपटे व शाल देऊन स्वागत करण्यात आले . लाभार्थी विद्यार्थिनी ऋतुजा आरगडे हिने या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले . सिंदफणा पब्लिक स्कूलच्या नृत्य शिक्षिका रेखा होके यांनी मुलांच्या दातांच्या स्वच्छतेसाठी वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोफत टूथब्रश वाटप केले . प्राचार्य अन्वर शेख यांनी प्रास्ताविक भाषणात प्रतिष्ठानच्या कार्याचा सविस्तर अहवाल सादर केला .

दंत चिकित्सक डॉ . रोहिणी देशमुख यांनी मौखिक आरोग्याविषयी मार्गदर्शक सूचना दिल्या . डॉ . संदीप नाटकर आणि डॉ . श्रीनिवास शिंगणे यांनी मोफत दंत तपासणी सेवा पुरवली .

डॉक्टरांनी प्रतिष्ठानच्या पुढाकाराचे कौतुक करताना सांगितले की, "दादा आणि वहिनी हे निराधार व अनाथांचे खरे नाथ आहेत ." प्रतिष्ठानच्या सचिव नीला देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना या साहित्याचा उपयोग करून चांगले शिक्षण घेण्याचे आवाहन केले . त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले .प्रतिष्ठानने २८ ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत इयत्ता ७वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी संभाजीनगर, दौलताबाद आणि वेरूळ येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन केले आहे, अशी माहिती पुरुषोत्तम सोळंके यांनी दिली .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नीला देशमुख होत्या तर प्रमुख पाहुणे डॉ . रोहिणी देशमुख होत्या . डॉ . श्रीनिवास शिंगणे, डॉ . संदीप नाटकर, माजलगाव निराधार तालुका अध्यक्ष दीपक थावरे, नगरसेवक राहुल लंगडे, महादेव वाघ आणि लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्थाचे कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके यांची विशेष उपस्थिती होती .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयमाला यांनी केले तर आभार प्रदर्शन सखाराम जोशी यांनी मानले . लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था शाखा माजलगाव आणि सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले .

## चाटगांवची उमा घनघाव मुंबई पोलिसात दाखल; तेलगाव येथे सत्कार संपन्न

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र व मुंबई उच्च न्यायालयात वकिली करणारे ॲड .उमेश गडसिंग यांची भाची उमा बालासाहेब घनघाव या नुकत्याच मुंबई पोलिस सेवेत रुजू झाल्या आहेत . या यशाबद्दल त्यांचा तेलगाव ता धारूर जि . बीड येथे डॉ . बाबासाहेब आंबेडकर बुद्ध विहार येथे भव्य असा सत्कार करून उमा घनघाव यांना पुढील आयुष्यात भरभरून यश व न्यायीक काम करण्यासाठी सुभेच्छा दिल्या . पुष्पा पाईक व ईतर महीलाच्या वतिने रदयपूर्वक सन्मान करण्यात आला .

या प्रसंगी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे धारूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब सोनटक्के, भिम आर्मी जिल्हा अध्यक्ष सिद्धार्थ मायदंळे .आर पि आय नेते वामन पाईक . तसेच गावातील मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते . त्यांनीही उमा घनघाव यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात केला .

उमा घनघाव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "मुलींनी लवकर लग्न करून संसारात अडकण्यापेक्षा डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदेशानुसार शिक्षण घेऊन, त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रचंड परिश्रम घेत यश संपादन केले पाहिजे ."त्यांच्या या यशाबद्दल गावात आणि पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण असून, तरुण पिढीसाठी त्यांनी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे .

## राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत अमराळे येथे ग्रामस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

➤ **धुळे : उमाकांत अहिरराव**

शिंदखेडा – राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत मौजे अमराळे येथे ग्रामस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समितीचे उपसभापती दीपक मोरे, माजी सभापती दीपक बोरसे तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय शिंदखेडा येथील कृषी अधिकारी सुधीर ईशी, सहाय्यक कृषी अधिकारी जयेश देसले, गटप्रमुख विठ्ठल गिरासे आदी मान्यवर उपस्थित होते . प्रशिक्षणाच्या प्रारंभी अतिथींनी नैसर्गिक शेतीविषयी शेतकऱ्यांशी संवाद साधला . कृषी अधिकारी सुधीर ईशी यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व, त्याचे पर्यावरणपूरक फायदे, तसेच रासायनिक शेतीवरील अवलंबित्व कमी करण्याची गरज स्पष्ट केली . त्यांनी माती नमुना परीक्षणाचे महत्त्व सांगत माती परीक्षण अहवालाचे सविस्तर स्पष्टीकरण दिले . यावेळी शेतकऱ्यांना कृषी विस्तार ॲप, यांत्रिकीकरण योजना आणि फळबाग






योजना यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले . शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सरकारी योजनांचा लाभ आणि माती परीक्षणानुसार पीक नियोजनाचे महत्त्व यावर भर देण्यात आला . कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शेतकऱ्यांना माती नमुना अहवालांचे वाटप करण्यात आले . उपस्थित मान्यवरांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचा अवलंब करून उत्पादन वाढीसह मातीची सुपीकता टिकवण्याचे आवाहन केले . या प्रशिक्षणामुळे ग्रामस्थ शेतकऱ्यांना शेतीतील नव्या तंत्रज्ञानाची व योजनांची माहिती मिळून कृषी उत्पादनक्षमता वाढविण्यास हातभार लागणार आहे .

## विहामांडवा जिल्हा परिषद गटासाठी शिवसेने कडुन मुकेश सेठ काला यांना उमेदवारी द्यावी !

### मुकेश काला शिवसेना पक्षातर्फे मजबुत दावेदार

➤ **विहामांडवा : इम्तीयाज शेख**

पैठण तालुक्यातील विहामांडवा गटातील जिल्हा परिषद पदासाठी आरक्षण जाहीर होताच विहामांडवा परिसरात राजकीय हालचालींना वेग आला आहे .विहामांडवा जिल्हा परिषद गट सर्वसाधारण पुरुषासाठी आरक्षण घोषित झाल्याने स्थानिकांमध्ये उमेदवार ठरविण्याबाबत चर्चा रंगल्या आहेत .विहामांडवा जिल्हा परिषद गटातुन शिवसेना( शिंदे गटाकडुन )विहामांडवा येथील उपसरपंच तथा पैठण मार्केट कमिटीचे संचालक, खासदार संदीपान भुमरे व आ .विलसबापु भुमरे यांचे जवळचे समर्थक मुकेश सेठ काला यांना पक्षाने उमेदवारी द्यावी अशी मागणी केली जात आहे . अनेक वर्षांपासून खासदार संदीपान भुमरे व आमदार विलासबापु भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली निस्वार्थपणे कार्यरत असलेले, सर्वसामान्य माणसाच्या मदतीला नेहमी धावून जाणारे तसेच सर्व धर्म समभाव जापणारे कार्यकर्ते म्हणून मुकेश सेठ काला यांची ओळख आहे . सद्या ते विहामांडवा ग्रामपंचायत उपसरपंच तथा पैठण मार्केट कमिटीचे संचालक आहेत . पक्षाचे सर्कल पदाधिकारी देखील आहेत कार्य उत्तम असल्याने यांनाच या विहामांडवा गटातून उमेदवारी






द्यावी अशी मागणी पक्षातील अनेक कार्यकर्ते करत आहेत .

गेल्या अनेक वर्षांपासून मुकेश सेठ काला यांनी गावातील सामाजिक, शैक्षणिक, तसेच सार्वजनिक प्रश्नांवर सातत्याने पाठपुरा करत सामान्य जनतेचा विश्वास संपादन केला आहे .

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, मुकेश सेठ काला यांनी पक्ष निष्ठा, शिस्त आणि सेवाभाव यांचा आदर्श घालून दिला आहे . गावाच्या विकासासाठी त्यांनी नेहमी पुढाकार घेतला .पक्षाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अधिकृत उमेदवारी द्यावी . विहामांडवा गटातील ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि युवकांनी निर्धार केला असुन मुकेश सेठ काला यांनाच विहामांडवा जिल्हा परिषद सदस्य पदाची उमेदवारी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे .

## ओबीसी समाजाच्या महाएल्गार सभेस बहुसंख्येने उपस्थित रहा : डॉ. संजय तांदळे

➤ **बीड : प्रतिनिधी**



ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना . छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवारी दि . 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4 .00 वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलनाच्या प्रांगणात ओबीसी समाज महाएल्गार सभेचे आयोजन समता परीक्षेचे प्रदेश सरचिटणीस ॲड . सुभाषराव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना . छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ओबीसी महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना .पंकजाताई मुंडे ,माजी मंत्री आ . धनंजय मुंडे ,माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश प्रकाश शेंडगे, आ .गोपीचंद पडळकर ,मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा लक्ष्मण हाके, भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड आदी ओबीसी मान्यवर नेते या सभेला उपस्थित राहणार आहेत . ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महा एल्गार सभा होणार असून या सभेला सर्व ओबीसी समाजातील युवक युती, बंधू-भगिनी सह समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष तथा ओबीसी महासंघ कृती समितीचे सदस्य डॉ .संजय तांदळे यांनी केले आहे .

सुट्टे पैसे नसल्याने वाद ➤ माजलगाव नविन बसस्थानक येथिल घटना

# शुल्लक कारणावरुन वाहकास ड्युटीवर मारहाण;; गुन्हा दाखल

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

फिर्यादी सिंकदर इब्राहिमखॉ तडवी पठाण वय ४६ वर्षे व्यवसाय एस टी वाहक नंबर ३६३४५ आगर माजलगाव रा लुखेगाव ता माजलगाव जि बीड येथील रहिवासी असून प्रवासी शेख मुहमद यांनी मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला या प्रकरणी समक्ष पोलीस स्टेशन येथे हजर येवुन तोंडी सांगुन फिर्याद देतो की मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी २०१९ पासुन एसटी महामंडाळामध्ये चालक तथा वाहक म्हणुन नौकरीस आहे . माजलगाव आगार येथे मागील १० महिण्यापासुन एसटी वाहक तथा चालक म्हणुन नेमणुक आहे .

दिनांक १५/१०/२०२५ रोजी एसटी क्रमांक एम एच २० बीएल २५५७ ही एस टी बस सोबत चालक भगवान श्रीराम शिंदे चालक नंबर ११६० आसे आम्ही माजलगाव ते जदिद जवळा दुपारी ०४ .०० वाजता माजलगाव येथुन निघुन ०५ .०० वाजता जदिद जवळा येथे पोहचलोत लागलीच



०५ .०५ मिनीटाने जदिद जवळा येथुन निघालात आमच्या बस मध्ये प्रवाशी अरोपी नामे शेख मुहमद शेख इब्राहिम रा . अरफात मोहल्ला माजलगाव हा व त्याच्या सोबत एक ईसम असे दोघे बसले होते . त्यांनी दोन तिकीटासाठी मला ५०० रुपयाची नोट दिली असता मी त्याला प्रति एक प्रवाशास ३६ रू प्रमाणे ७२ रुपयाचे तिकीट व नगदी ४२० रुपये परत दिले व आमची बस माजलगाव नविन बसस्थानक येथे ०६ .००वाजता पोहचलो मी बसच्या खाली उतरलो असता प्रवाशी आरोपी शेख मुहमद शेख इब्राहिम हा मला राहिलेले आठ रुपये मागण्यासाठी आला असता त्यास मी म्हणालो मला दोन रुपये दे मी तुला दहा रुपये देतो असे म्हणालो असता त्यावर आरोपी शेख मुहमद शेख इब्राहिम हा मला म्हणाला की तु माझा नौकर आहेस तु मला पैसे आणुन दे आसे म्हणाला मी खाकी गणवेशात ड्युटीवर असताना त्याने माझी शर्टची गचुरी पकडुन माझे तोंडावर हाताच्या बुक्याने मारुन शिवीगाळ करुन मला खाली पाडुन मुक्कामार देवुन प्रवाशी आरोपी नामे शेख मुहमद शेख इब्राहिम याने मी एसटी महामंडळ येथील सरकारी काम करित असताना माझे कामात अडथळा आणुन मला शिवीगाळ करुन हाताने तोडावर मारुन मुक्कामार दिला म्हणुन आरोपी शेख मुहमद शेख इब्राहिम रा . अरफात मोहल्ला माजलगाव याचे विरुद्ध गुन्हा प्रथम खबर क्रमांक ०३७३, कलम,भारतीय न्याय संहिता ( बी एन एस ), २०२३, १३२, ११५, ३५२, गुन्हा शहर पोलीस स्टेशन माजलगाव येथे दाखल पुढील तपास संदीप मोरे हेड कॉन्स्टेबल हे करत आहे .